# एकात्मिक पध्दतीने व्यवस्थापन

**मशागतीय पध्दती :**


- उन्हाळ्यामध्ये खोलगट नांगरणी करावी.
- लवकर पक्व होणाऱ्या वाणाची निवड करून लवकर पेरणी करावी व याचा गाव किंवा विभागीय पातळीवर अवलंब करावा.
- किडीस प्रतिकारक्षम वाणाची निवड करावी.
- सापळा पिकाची लागवड करणे उदा. घास गवत.
- रासायनिक खताचा समतोल वापर करावा.

**यांत्रिक पध्दती :**

- पिकावरील अंडीसमूह गोळा करून नष्ट करावे.
- पिकाचे नियमित सर्वेक्षण करावे व या किडीचे पतंग आकर्षित करणसाठी प्रकाश सापळे व कामगंध सापळ्याचा वापर करावा.
- पक्षी थांब्याचा वापर करावा.
- पोंग्यातील अळी मारण्यासाठी पोंग्यात माती/वाळू/राख/लाकडाचा भुस्सा टाकणे.

**जैविक पध्दत :**

- एन.पी.व्ही. विषाणू किंवा न्युमोरिया रिलाई किंवा मेटारिझीयम अॅनीसोपोली या जैविक किटक नाशकाची ४ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी संध्याकाळच्या वेळेस करावी.
- टेलेनोमस रेमस या परोपजीवी किटकांचे एकरी ५० हजार अंडी या प्रमाणे शेतात सोडावे. त्यानंतर ४ ते ५ दिवसापर्यंत रासायनिक किटकनाशकांची फवारणी करू नये.





कीडीला खाणारे परभक्षी कीटकांचा प्रसार करणे. उदा. लेडी बर्ड बिटेल, ग्राऊंड बिटेल व मुंग्या इ.

सुरुवातीच्या पोंग्याची अवस्थेमध्ये ५% प्रादुर्भावग्रस्त झाडे आढळल्यास अझाडीरॅक्टीन १५०० पीपीएम ५ मिली प्रतिलिटर पाण्यातून फवारावे.

**रासायनिक पध्दत :**

लष्करी अळीने प्रादुर्भावग्रस्त झालेली १०-२०% झाडे आढळून आल्यास खालीलपैकी कीटकनाशकाची फवारणी करावी.

| किटकनाशक | मात्रा/१०लि. पाणी |
|---|---|
| ईमामेक्टीन बेन्झॉइट ५एस.जी. **किंवा** | ४ ग्रॅम |
| स्पिनोसॅड ४५ एस.सी. **किंवा** | ३ मि.ली. |
| थायोमेथोक्झाम १२.६ टक्के + लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ९.५टक्के **किंवा** | ५ मि.ली. |
| क्लोरॅट्रॅलीनीप्रोल १८.५ टक्के | ४ मि.ली. |
| कार्बोफ्युरॉन ३% दाणेदार सी.जी. १० कि.ग्रॅ./हे. | जमिनीत ओला असताना फेकीव पद्धतीने वापरा |

वरील रासायनिक कीटकनाशकाच्या शिफारशी केंद्रीय कीटकनाशक बोर्ड, फरीदाबाद यांच्याकडून केलेल्या आहेत.


**• लेखक •**

श्री. स. पा. जवळगे — विषय विशेषज्ञ, पिक संरक्षण

श्री. अ. बि. शास्त्री — विषय विशेषज्ञ, कृषिविद्या

डॉ. ला. रा. तांबडे — वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख


**• तांत्रिक माहिती स्त्रोत •**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

# मक्यावरील लष्करीअळी (स्पोडोप्टेरा फ्रुगीपरेडा) एकात्मिक पध्दतीने व्यवस्थापन




संपादक व प्रकाशक

डॉ. लालासाहेब रा. तांबडे

वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख

शबरी कृषी प्रतिष्ठान, सोलापूर संचलित

**कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर**

गट नं. २२/१ ब, सोलापूर-बार्शी रोड, मु. खेड, पोस्ट - केगांव, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर

## मक्यावरील लष्करीअळी एकात्मिक पध्दतीने व्यवस्थापन

मक्यावरील लष्करी अळीची नोंद भारतामध्ये सर्वप्रथम तामिळनाडू व कर्नाटक राज्यात जून-जुलै च्या दरम्यान दिसून आली. याच हंगामामध्ये या किडीचा प्रादुर्भाव आंध्र प्रदेश व तेलंगणा या राज्यात सुध्दा दिसून आला. महाराष्ट्रात सप्टेंबर २०१८ मध्ये तांदूळवाडी, तालुका माळशिरस जिल्हा सोलापूर येथे या किडीची नोंद झाली.

### जीवन क्रम

या अळीची उन्हाळ्यात ३० दिवसात एक पिढी पूर्ण होते व हिवाळ्यात हा कालावधी दोन महिन्यापर्यंत वाढू शकतो. या किडीला एका वर्षात अखंड खाद्य मिळाल्यास ३ ते ४ पिढ्या विविध वनस्पतीवर पूर्ण होऊ शकतात.




- अंडी अर्ध गोलाकार, पांढरट असून पानावर एका समुहात १०० ते २०० अंडी आढळतात.
- उष्ण वातावरणामध्ये मादी पतंग १०० ते ३०० अंडी घालते. एक मादी तिच्या जीवनक्रमात २ ते ३ आठवड्यात सरासरी १५०० ते २००० अंडी देऊ शकते.

### अळी :

- अळीच्या सहा अवस्था असतात. पूर्ण वाढ झालेल्या अळीच्या तोंडावर पांढऱ्या रंगाचे उलट्या (Y) आकाराचे चिन्ह दिसते. पोटाच्या आडव्या कप्प्यावर



- अळी १४-२० दिवसाची असते (हंगामानुसार) उन्हाळ्यात १४ दिवसाची तर हिवाळ्यात किंवा थंड वातावरणात ३० दिवसापर्यंत असू शकते.

### कोष :

- कोष चकाकनारे आणि तपकिरी रंगाचे असतात. कोष सर्वसाधारणपणे १५मि.मि. असतात.
- कणसातील अळी कणसातच कोशात जाऊ शकते.



### प्रौढ :




- नरामध्ये समोरचे पंखावर राखाडी व तपकिरी रंगाच्या छटा असतात. टोकाला व मध्य भागाजवळ त्रिकोणी पांढरे ठिपके असतात.




### खाद्य वनस्पती :

ही किड बहुभक्षीय असून ८० पेक्षा जास्त वनस्पतीवर आपली उपजीविका करते. उदा. मका, मधुमका, ज्वारी, भात, ऊस व गवतवर्गीय तणे इत्यादी.

### नुकसानीचा प्रकार :





- अंड्यातून बाहेर आलेल्या अळ्या पानाचा हिरवा पापुद्रा खातात व पानाला पांढरे चट्टे पडतात.
- दुसऱ्या ते तिसऱ्या अवस्थेतील अळ्या पानाला छिद्रे पाडतात व पानाच्या कडा खातात. ही अळी पोंग्यात पानाला छिद्रे पाडण्याचे काम करतात.
- पोंग्यातून बाहेर आलेल्या पानावर एकसमान किंवा एका रेषेत छिद्रे दिसतात.
- पोंगा धरण्याची सुरूवातीची अवस्था प्रादुर्भावास थोडी कमी बळी पडते, मध्यम पोंगे अवस्था त्यापेक्षा जास्त तर उशीरा पोंगे अवस्था अळीला सर्वात जास्त बळी पडते.